**वारस अर्ज क्र.४९/२०२५**
**अशोक वि. अरविंद**
**निशाणी क्र. २४**

**उलटतपास जाबदारतर्फे विधीज्ञ श्री. डी.एस.पिसे यांच्यामार्फत सुरु-**

सदर प्रकरणातील घर मिळकत नंबर किती आहे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणातील घर मिळकत किती स्केअर फुट आकाराची आहे हे मी सांगु शकत नाही. घर मिळकत ही ज्ञानु सिताराम आढाव यांची होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची घर मिळकत ही अस्तित्वात नाही. मी सदर मिळकतीचा कागद पाहण्याचा संबंध आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर मिळकतीबाबत खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मला अशोक अथवा अरविंद न्यायालयात साक्षीस घेवून आले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिज्ञापत्रात नमुद असलेला मजकूर खोटा आहे व अशी कोणतीही घर मिळकत आजरोजी अस्तित्वात नाही.

हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार अर्जात मागणी करीत असल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे, हे मी खोटे सांगत आहे. माझे घर रानामध्ये आहे, त्यामुळे गावातील मिळकतींना सिटी सर्वे नंबर आहे किंवा कसे हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रात नमुद मिळकत अस्तित्वातच नाही व मी अर्जदाराच्या सांगण्यावरुन खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष,

फलटण. (ए.एस.साटोटे)
दिनांकः ०४.०७.२०२६ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर, फलटण